दै. गोदातीर दि. 26.01.25

# १६ वर्षांपासून फरार खुनी आरोपीला मध्य प्रदेशमधून अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** सन २००९ मध्ये एकाचा खून करून फरार झालेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तब्बल १६ वर्षांनंतर अटक केली आहे. सदर आरोपी मध्यप्रदेशात लपून बसला होता; मात्र नांदेड पोलिसांनी अखेर आरोपीला जेरबंद केले.



हिमायतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सन २००९ मध्ये एकाचा खून करण्यात आला होता. हरी गुलाब चव्हाण उर्फ हरी गुलाबसिंह चौहाण याने त्याचा खून केला होता. आरोपी सन २००९ पासून फरार होता. त्याने मध्यप्रदेशातील सिहोड जिल्ह्यातील आस्था तालुक्यातील आमलाजोड डोडी येथे वास्तव्यास होता. नाव बदलून आणि स्वतःची ओळख बदलून आरोपी हरी चव्हाण तब्बल १५ वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देत होता. या गुह्याची उकल करण्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आदेशित केले होते.

स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे, पोलीस उपनिरीक्षक बळीराम दासरे आणि काही अंमलदारांचे पथक तयार करून आरोपीच्या शोधासाठी मध्यप्रदेशाला रवाना केले होते. गुप्त माहितीच्या आधारे पोलीस पथकाने मध्यप्रदेशातील आम्लाजोड डोडी येथून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याला हिमायतनगर पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.